बुधवार, दि ६ मे २०२६ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक ३२ वा ● किमंत २ रु. ● पाने ४

RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# जालन्यात अल्पवयीन मुलांच्या नावावर चंदा वसुली प्रकरण; बाल हक्क आयोगाची सुयो-मोटो दखल

## नेपाळ, बिहार व बंगालमधील १३ मुलांची सुटका; आरोपी शिक्षकावर कठोर कारवाईचे आदेश

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात अल्पवयीन मुलांच्या नावावर चंदा वसुली करून आर्थिक गैरव्यवहार केल्याच्या गंभीर आरोपांनी खळबळ उडाली असून या प्रकरणाची दखल महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने सुयो-मोटो पद्धतीने घेतली आहे. संबंधित प्रकरणात नेपाळ, बिहार आणि पश्चिम बंगाल येथील एकूण १३ अल्पवयीन मुलांची सुटका करण्यात आल्याची माहिती समोर आली असून, या मुलांच्या हक्कांचे उल्लंघन, संभाव्य मानवी तस्करी आणि शोषणाच्या पार्श्वभूमीवर आयोगाने तातडीने कारवाईचे आदेश दिले आहेत. दि. ४ मे २०२६ रोजी आयोगाच्या वतीने जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तसेच बाल कल्याण समिती अध्यक्ष यांना पत्र पाठवून सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या प्रकरणाबाबत एका वृत्तवाहिनीवर प्रसिद्ध झालेल्या बातमीच्या आधारे आयोगाने स्वतःहून दखल घेतली आहे.

प्राथमिक माहितीनुसार, जालन्यातील एका मदरसा शिक्षकावर अल्पवयीन मुलांच्या नावावर विविध ठिकाणी चंदा वसुल करून मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे. अब्दुल रऊफ अन्सारी असे संबंधित शिक्षकाचे नाव असल्याचे समोर आले असून, या संदर्भात मौलाना सय्यद जमिल जानिमिया यांनी पोलीस अधीक्षकांकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारीनंतर सदर बाजार पोलिसांनी तत्काळ तपास सुरू केला आहे. या तपासादरम्यान पोलिसांनी एकूण १३ अल्पवयीन मुलांची सुटका केली असून सध्या त्यांना बाल निरीक्षणगृहात ठेवण्यात आले आहे. सुटका करण्यात आलेल्या मुलांमध्ये नेपाळमधील सहा मुलांचा समावेश असल्याचे समजते. उर्वरित मुले बिहार आणि पश्चिम बंगाल येथील असल्याची माहिती समोर आली आहे. या मुलांच्या पालकांशी संपर्क साधण्याचे प्रयत्न पोलीस प्रशासनाकडून सुरू आहेत. सदर प्रकरण अत्यंत गंभीर असल्याचे लक्षात घेऊन बाल हक्क आयोगाने सहा महत्त्वपूर्ण निर्देश जारी केले आहेत. त्यानुसार, जिल्हा प्रशासनाने तात्काळ प्राथमिक कार्यवाही अहवाल सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच संबंधित आरोपीविरुद्ध लागू कायद्यांनुसार कठोर कारवाई करावी, असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. याशिवाय सुटका करण्यात आलेल्या सर्व मुलांचे वैद्यकीय परीक्षण, समुपदेशन आणि पुनर्वसनाची योग्य व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मुलांच्या मूळ राज्यांशी समन्वय साधून त्यांची सुरक्षित पुनर्वापसी सुनिश्चित करणेही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.

या प्रकरणात बाल तस्करी, बालकामगार, लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा () तसेच बाल न्याय ( ) अंतर्गत कोणती कारवाई करण्यात आली आहे, याचा सविस्तर तपशील सादर करण्यास सांगण्यात आले आहे. तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी कोणत्या प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जात आहेत, याची माहितीही आयोगाने मागवली आहे. तपासादरम्यान आणखी एक धक्कादायक बाब समोर आली असून, शहरातील विविध भागात चंदा वसुलीसाठी पेट्या ठेवण्यात आल्याचा आरोप आहे. या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी गोळा करण्यात आला असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. संबंधित ट्रस्ट नोंदणीकृत आहे का, चंदा वसुलीसाठी आवश्यक परवानगी घेण्यात आली होती का, आणि गोळा झालेल्या निधीचा वापर नेमका कशासाठी करण्यात आला, याचाही तपास पोलिसांकडून सुरू आहे.

सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती यांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणाची चौकशी सखोलपणे सुरू असून सर्व पैलूंवर बारकाईने तपास केला जात आहे. चौकशी पूर्ण झाल्यानंतर दोषींवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष ॲड. संजय पुराणिक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या प्रकरणाचा आढावा घेण्यात आला.

आयोगाचे सदस्य डॉ. संजय लाखेपाटील यांनीही या प्रकरणाची गंभीरता अधोरेखित करत संबंधित यंत्रणांनी तत्काळ आणि प्रभावी कारवाई करणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. प्रकरणातील संवेदनशीलता लक्षात घेता प्रशासन आणि पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून, अल्पवयीन मुलांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देत पुढील कारवाई केली जात आहे. या प्रकरणातील तपासातून नेमके कोणते धागेदोरे समोर येतात आणि दोषींवर कितपत कठोर कारवाई होते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

तसेच जिल्हा प्रशासनाकडून या प्रकरणाचा सविस्तर अहवाल मागितला असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे सदस्य डॉ. संजय लाखेपाटील यांनी दिली आहे.

---

## जालना मर्चंट बँक गैरव्यवहार संबंधी बैठक संपन्न

# जुलै २०२६ पर्यंत विमा रक्कम मिळण्याची शक्यता; ठेवीदारांनी घाबरुन जावू नये-जिल्हाधिकारी

**जालना । प्रतिनिधी -** जालना मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेतील गैरव्यवहारावर जिल्हा प्रशासन सर्व परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहे. तसेच बँकेतील ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत सर्वतोपरी प्रयत्न केले जात असुन, ठेवीदारांनी घाबरुन जावू नये असे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आवाहन केले आहे.

जालना मर्चंट कोऑपरेटिव्ह बँकेतील झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आज महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी बैठकीस जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, संजय बोराडे, जालना मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँके मुख्य कार्यकारी अधिकारी कांचन केळकर यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी, बँकेचे प्रतिनिधी तसेच प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, जालना मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेतील ठेवीदारांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. याबाबत संबंधित यंत्रणांना आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच भविष्यात अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्यासाठी काटेकोर उपाययोजना राबविण्याचे देखील निर्देश देण्यात आले. याबाबत ठेवीदारांनी अफवांवर विश्वास न ठेवता, अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यावेळी केले.

बैठकीदरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. केळकर यांनी बँकेच्या सध्याच्या स्थितीबाबत माहिती देताना सांगितले की, बँकेच्या विलीनीकरणाबाबत चर्चा सुरू असून, यासंदर्भात १ एप्रिल, २०२६ रोजी प्राथमिक माहिती देण्यात आली आहे. तसेच, छत्रपती संभाजीनगर येथील देवगिरी सहकारी बँकेमार्फत बँकेचे ऑडिट व कागदपत्रांची तपासणी प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. बँकेच्या आर्थिक स्थितीबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, सद्या बँकेकडे सुमारे १७३ कोटी रुपयांच्या ठेवी असून, त्यापैकी सुमारे १२७ कोटी रुपये कर्जरूपाने वितरित करण्यात आले आहेत. याशिवाय बँकेचे स्वतःचे भांडवल, इतर बँकांमधील गुंतवणूक आणि शासकीय रोख्यांमधील गुंतवणूक मिळून सुमारे ७५ कोटी रुपयांची रक्कम बँकेकडे उपलब्ध आहे. बँकेचे एकूण सुमारे ५० हजार खातेदार असून, त्यापैकी ४९ हजारांहून अधिक खातेदारांना ठेवी विमा योजनेअंतर्गत लाभ मिळण्याची शक्यता आहे. सद्या विविध शाखांमध्ये विमा दावा फॉर्म संकलन व सादरीकरणाची प्रक्रिया सुरू आहे. उपलब्ध माहितीनुसार, पात्र ठेवीदारांच्या खात्यात विमा रक्कम जुलै २०२६ पर्यंत जमा होण्याची शक्यता असल्याची माहिती ही श्री. केळकर यांनी यावेळी दिली. यावेळी जिल्हाधिकारी अशिमा मित्तल **पान २ वर**

---

# जालन्यातील ‘त्या’ तिन्ही योजनांचा जागतिक बँक सहाय्यित यादीत समावेश करा

## जालन्याचे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर सुधारीत पाणी पुरवठा योजना, भुयारी गटार योजना व सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर योजनेचा समावेश जागतिक बँक सहाय्यित यादीमध्ये समावेश करून प्रशासकीय मान्यता देण्यात यावी अशी मागणी जालन्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे,माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर, भाजपा जिल्हाध्यक्ष आ.नारायणराव कुचे, आ.संतोष पाटील दानवे,माजी आमदार कैलास गोरंटयाल आणि भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्करराव दानवे जालना शहर व जिल्ह्यातील विकास कामांसाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून जालना शहरातील भविष्यातील वाढती लोकसंख्या आणि पाण्याची मागणी लक्षात घेऊन जालन्याचे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई येथे मंत्रालयात त्यांच्या दालनात भेट घेऊन त्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन दिले आहे.या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, जालना शहर हे स्टिल उत्पादनाचे मोठे औद्योगिक शहर असून, शहराची लोकसंख्या ही झपाट्याने वाढत आहे. त्यातच जालना नगर परिषदेचे महानगरपालिकेमध्ये रूपांतर झाले आहे. परंतु वाढत्या लोकसंख्येचा विचार केल्यास आवश्यक त्या प्रमाणात पायाभूत सुविधा पूर्णत्वाकडे आहे. सदर योजना लवकरच पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होणार असली तरी जालना शहराची व्याप्ती झपाट्याने वाढत असून नव्याने वाड्या-वस्त्या विकसीत होत आहे. त्यामुळे भविष्यात

### सर्वेक्षणासाठी पथक लवकरच जालन्यात येणार - गोरंटयाल

जालना शहर सुधारित पाणी पुरवठा योजना, भुयारी गटार योजना,सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर योजनांचा जागतिक बँक सहाय्यित यादीत समावेश करण्याबरोबरच शहरासाठी नवीन पाणी पुरवठा योजना टप्पा -२ या मागण्यांबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद देत या सर्व बाबतीत सर्वेक्षण करण्यासाठी जालन्यात लवकरच तज्ञ अधिकाऱ्यांचे पथक पाठवण्यात येईल अशी ठाम ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याचे माजी आमदार कैलास गोरंटयाल सांगितले.

लोकसंख्येत होणारी वाढ लक्षात घेता सन २०४५ साली शहराची लोकसंख्या ५ लक्ष इतकी होण्याची शक्यता असून, त्यावेळची पाणी मागणी ७५ इतकी असू शकते व सन २०६० साली ६ लाख इतकी लोकसंख्या असू शकते, त्यामुळे २०४५ साली शहराची पाणी मागणी वाढून ७५ इतकी होऊ शकते. त्यामुळे पुढील काही वर्षातच शहरातील पाणी प्रश्न पुन्हा बिकट होऊ शकतो. त्यामुळे पुढील ३० वर्षाची लोकसंख्या व पाणी मागणी विचारात घेऊन जालना शहरास उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आणून देत माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी शहरातील भविष्यात निर्माण होणाऱ्या पाणी टंचाईकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले. जालना शहराची ४ लाख २५ हजार इतकी लोकसंख्या ग्राह्य धरुन जायकवाडी योजना तयार करण्यात आली असून सदर योजनेद्वारे सध्या जालना शहरा करीता पाण्याची मागणी ही ६० इतकी आवश्यक आहे व सदर योजनमध्ये नवीन जलशुद्धीकरण केंद्र अनुक्रमे ३५ व १५ नव्याने उभारणी करण्याचे काम

**पान २ वर**

## संपादकीय

# ऊस शेतीसाठी डिजिटल क्रांती की नव्या आव्हानांची चाहूल?

जालना जिल्ह्यात सुरू झालेला 'सुपर ५० एआय फार्मर्स' हा प्रकल्प केवळ एक कृषी उपक्रम नाही, तर पारंपरिक शेती आणि आधुनिक तंत्रज्ञान यांच्यातील दुवा निर्माण करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रयत्न आहे. सॅटेलाइट डेटा, कृत्रिम बुद्धिमत्ता () आणि मोबाईल ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्यांना थेट मार्गदर्शन देण्याची संकल्पना नक्कीच स्वागतार्ह आहे. मात्र, या उपक्रमाकडे केवळ आशावादाने नव्हे, तर वास्तववादी दृष्टिकोनातून पाहणेही तितकेच गरजेचे आहे.

**तंत्रज्ञानाचा सकारात्मक पैलू: अचूक शेतीकडे वाटचाल**

आजच्या काळात शेतीसमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे अनिश्चित हवामान, वाढता उत्पादन खर्च आणि घटते उत्पन्न. अशा परिस्थितीत  आधारित मार्गदर्शन शेतकऱ्यांसाठी गेमचेंजर ठरू शकते. पीक आरोग्य स्कोअर, पाणी-खत व्यवस्थापन, तण ओळख आणि कापणी नियोजन यांसारख्या सूचनांमुळे 'प्रिसिजन फार्मिंग' (अचूक शेती) शक्य होईल. यामुळे उत्पादनात वाढ, खर्चात बचत आणि संसाधनांचा योग्य वापर साध्य होऊ शकतो.

विशेष म्हणजे, कोणत्याही अतिरिक्त सेन्सर्सशिवाय केवळ सॅटेलाइट डेटावर आधारित प्रणाली असल्याने, हा प्रकल्प तुलनेने किफायतशीर ठरू शकतो. त्यामुळे भविष्यात मोठ्या प्रमाणावर विस्ताराची शक्यता अधिक मजबूत होते.

**जालना मॉडेल: राज्यासाठी दिशादर्शक ठरण्याची क्षमता**

'रायझिंग जालना' या उपक्रमातून सादर झालेला हा प्रकल्प यशस्वी ठरल्यास, तो संपूर्ण महाराष्ट्रासाठी 'मॉडेल' ठरू शकतो. विशेषतः ऊस शेतीसारख्या पाण्यावर अवलंबून असलेल्या पिकात  चा वापर करून पाणी व्यवस्थापन सुधारण्याची संधी निर्माण होते, जी आजच्या दुष्काळग्रस्त भागांसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. याशिवाय, प्रशासन, खासगी तंत्रज्ञान कंपनी आणि शेतकरी यांच्यातील त्रिसूत्री भागीदारी ही भविष्यातील कृषी विकासाचा नवा मार्ग दाखवते.

पण प्रश्नही तितकेच गंभीर: डिजिटल दरी आणि वास्तव

या प्रकल्पातील सर्वात मोठे आव्हान म्हणजे डिजिटल साक्षरता. मोबाईल ॲपवर आधारित सूचना मिळणार असल्या तरी, सर्वच शेतकरी त्या प्रभावीपणे वापरू शकतील का? ग्रामीण भागात इंटरनेट कनेक्टिव्हिटी, स्मार्टफोन वापराची सवय आणि तांत्रिक समज यांचा अभाव अजूनही मोठ्या प्रमाणावर आहे.

तसेच, सॅटेलाइट डेटा हा व्यापक असतोतो प्रत्येक शेताच्या सूक्ष्म गरजांशी कितपत जुळेल, हा प्रश्न अनुत्तरित आहे.

''डेटा अचूक असेल, पण त्याचे अर्थ लावणे आणि त्यावर कृती करणे हे मानवी हस्तक्षेपाशिवाय शक्य आहे का?'' हा मुद्दाही विचारात घ्यावा लागेल.

**फक्त ५० शेतकरीउर्वरितांचे काय?**

हा प्रकल्प सध्या केवळ ५० शेतकऱ्यांपुरता मर्यादित आहे. त्यामुळे त्याचा प्रभाव मर्यादित राहण्याची शक्यता आहे.

जर हा उपक्रम खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवायचा असेल, तर त्याचा विस्तार लवकर आणि व्यापक स्वरूपात करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा, तो 'प्रातिनिधिक यश' ठरेल, पण 'सर्वसमावेशक बदल' घडवू शकणार नाही.

**खासगी कंपन्यांची भूमिकासंधी की धोका?**

 सारख्या कंपन्यांचा सहभाग तंत्रज्ञानाच्या दृष्टीने फायदेशीर असला, तरी डेटा गोपनीयता आणि नियंत्रण याबाबत स्पष्ट धोरण आवश्यक आहे. शेतकऱ्यांचा डेटा कोणाच्या मालकीचा असेल? त्याचा वापर कसा होणार? याबाबत पारदर्शकता अत्यंत महत्त्वाची आहे.

**योग्य अंमलबजावणीच ठरवेल यश**

'सुपर ५० एआय फार्मर्स' हा प्रकल्प नक्कीच दूरदृष्टी दाखवणारा आहे. पण त्याचे यश केवळ तंत्रज्ञानावर अवलंबून नसून, अंमलबजावणी, प्रशिक्षण, विस्तार आणि पारदर्शकता यांवर अवलंबून असेल. जर प्रशासनाने शेतकऱ्यांना योग्य प्रशिक्षण दिले, डिजिटल पायाभूत सुविधा मजबूत केल्या आणि प्रकल्पाचा विस्तार सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत केला, तर हा उपक्रम जालना नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी 'कृषी क्रांतीचा नवा अध्याय' ठरू शकतो. अन्यथा, तो केवळ कागदावरचा 'स्मार्ट' प्रकल्प राहण्याचीही भीती नाकारता येत नाही.

# गरीब दुबळ्यांची घरे पाडा आणि तिथे जाऊन नुसतेच रडा! याच्या शिवाय भोकरदन चे पुढारी काय करतात? - बोरसे गुरुजी

**दत्ता देशमुख**
**टेंभूर्णी -**

'' सासू मेली रडे सुनं! डोळे धुपणावर धरूनं!''

जनते बद्दल जनतेच्या प्रश्नांबाबत भोकरदनच्या पुढाऱ्यांना कोणतेही प्रेम नाही.फक्त पुर्णवेळ राजकारण अशी अवस्था भोकरदनच्या पुढाऱ्यांची आहे. एखाद्या ठिकाणी अन्याय झाला तर फोटो काढण्यासाठी व्हिडिओ बनवण्यासाठी तिथे जातात. भाषणे ठोकून राजकारण करतात. परंतु त्या ठिकाणच्या लोकांना न्याय मिळत नाही. न्याय कसा मिळणार! कारण अन्याय करणारे हेच असतात.उजेडात जरी हे वेगवेगळे दिसत असले तरी अंधारात यांचे शेपटं एकमेकाला बांधलेले आहेत. विकासाच्या नावाखाली पंचायत समितीच्या पाठीमागे असलेल्या परिसरातील गरीब लोकांची घरे पाडण्यात आली या अगोदरही दानवे जवखेडा या ठिकाणी कुंभाराची घरे पाडण्यात आली होती आणि पुढारी त्या ठिकाणी जाऊन ढसाढसा रडले होते. भाषणे ठोकली होती. पुढे काय झाले? त्यांना न्याय मिळाला का ? गुन्हेगाराला शिक्षा झाली का ? अर्थातच या सर्व प्रश्नांची उत्तरे नकारार्थी आहेत. भोकरदन च्या पुढाऱ्यांना फक्त राजकारण करायचे असून समाजाची घडी विस्कटून टाकायची आहे. ही त्यांची मनीषा असून भोळ्या भाबड्या जनतेच्या भरोशावर वर्षानुवर्ष खुर्चीला चिकटून राहणे आणि आपली आपल्या कुटुंबाची आणि आपल्या सोयऱ्या धायऱ्यांची व्यवस्था लावणे याच्या शिवाय या पुढाऱ्यांनी काहीच केलेलं नाही. निस्वार्थभाव, समाजसेवा,त्याग,प्रेम हे शब्द यांच्या डिक्शनरी मध्ये नाहीत. यांच्यापेक्षा यांचेच यांच्यांच पक्षांचे कार्यकर्ते हुशार आहेत परंतु त्या कार्यकर्त्याला पुढे न येऊ देणे यासाठी त्यांना अवैध धंद्याला लावणे, दारूच्या व्यसनात अडकवणे, खोट्या केसेस करणे अशी लबाडी वर्षानुवर्ष चालू आहे. इकडे खेड्यापाड्यामध्ये शेतकरी उन्हातान्हामध्ये मिरचीची लागवड करत आहे. अनेक संकटाना तोंड देत आहेत. शेती उपयुक्त अनेक साहित्याचे भाव बाजारात वाढलेले आहेत यांना त्याच्याशी काही सोयर सुतक नाही. कोणत्याच कार्यालयामध्ये सामान्य जनतेचे काम सहज होत नाही. पैसे द्यावेच लागतात.  त्या पैशांमध्येही यांची टक्केवारी ठरलेली असते. तालुक्यातील कोणताही धंदा करणारे दुकानदार असो वाईट मार्गाने पैसे कमावणारे असो त्यांना आपल्याच आधीपत्या खाली ठेवून त्यांचा पुरेपूर फायदा घेण्याचे काम हे लोक करतात. परंतु प्रत्यक्षात कोणाच्या पदरात काहीच पडू देत नाहीत. निवडणुका जिंकले किंवा हरले तरी नफ्यात असतात असं खेड्या पाड्यामध्ये प्रत्येक कार्यकर्त्यांमध्ये बोलल्या जात आहे. सध्या भोकरदन मध्ये



अतिक्रमण हटवण्याची मोहीम भोकरदनच्या नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्याने हाती घेतली आहे. राजकीय पुढारी मात्र सर्व काही मुख्याधिकाऱ्यावर ढकलून नामा निराळे झाले आहेत. म्हणजे '' मी नाही त्यातली आणि कडी लावा आतली '' अशी अवस्था आहे. असे जर आहे तर पुन्हा त्या ठिकाणी जाऊन नक्राश्रू ढाळण्याची गरज काय ? नगरपरिषदे च्या मुख्याधिकाऱ्याला इतकी हिंमत आहे काय ? राजकीय पुढाऱ्यांना विचारल्याशिवाय त्यांच्या पाठिंब्याशिवाय मुख्याधिकारी असे कामे करूच शकत नाही. घरे पाडण्यासाठी पाठिंबा द्यायचा आणि पुन्हा जनतेसमोर जाऊन रडायचे अशी दुटप्पी भूमिका बंद करा! कोणत्यातरी एका मार्गाने चाला ना ! जनतेला उल्लू बनवणे बंद करा.जनतेला सर्व कळतें परंतु पर्याय नाही. त्यामुळे या पुढाऱ्यांना खात्री आहे की जे रुसतील ते आपल्याकडे येतील.त्यामुळे फक्त फोडा आणि झोडायची राजनीती संपूर्ण ठिकाणी हे लोक करत असतात. त्यामध्ये जनतेचा अतिशय तोटा असून यांच्या राजकारणाच्या पोळ्या मात्र शेकल्या जातात. सर्वच पुढाऱ्यांना आव्हान आहे की आपण जर या लोकांना न्याय देऊ शकत नसाल तर किमान अन्याय तरी करू नका! आणि अन्याय करत असाल तर त्या ठिकाणी रडण्यासाठी जाऊ नका! जनतेला देवाच्या भरोशावर सोडून द्या जनता पाहिल आपल काय करायचे ते. खरं म्हणजे जेवढा सज्जन, जेवढा त्यागी, जेवढा निस्वार्थि  तेवढ्या मोठ्या पदावर ती व्यक्ती असली पाहिजे. परंतु सध्या उलटी परिस्थिती या लोकांनी करून ठेवली आहे जेवढा लबाड, जेवढा लुच्चा, जेवढा स्वार्थी ,जेवढा कपटी ,आणि जेवढा भ्रष्ट तेवढे मोठेपद त्याला मिळते आणि तो अन्याय करायला मोकळा होतो शेवटी जनतेच्या आता या सर्वगोष्टी लक्षात येत आहेत एक दिवस या सर्व पुढाऱ्यांना जनता घरी बसवल्याशिवाय राहणार नाही.

भोकरदन नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना आमची विनंती आहे आणि पाठिंबा ही आहे की, आता अतिक्रमण काढण्याची मोहीम जर हातात घेतलेलीच आहे तर सरसकट गरीब असो श्रीमंत असो सामान्य जनतेतला असो किंवा मोठा पदाधिकारी असो सर्वांचेच १०० % अतिक्रमण काढा! आणि या भामट्या पुढाऱ्यांनाही आमची विनंती आहे की,स्वतःहून तुम्ही केलेले नगरपरिषदेच्या करोडो रुपयांच्या जागेवरील अतिक्रमण काढून घ्या! तुमचे वाईट धंदे सोडा! नंतरच जनते जवळ जाऊन रडा! सामान्य नागरिकांनी दहा फुटात बांधलेली झोपडी यांना चालत नाही परंतु आणि अनेक एकरामध्ये अतिक्रमण करून बांधलेले यांचे बंगले चालतात कसे ? जर तुम्ही धुतले तांदूळ असाल तर तुमच्या जागेचे सर्व कागदपत्र सार्वजनिक करा आणि समजू द्या तुम्ही किती निस्वार्थी आहात ?

एक मे रोजी एका पुढाऱ्याने भेटून मुख्याधिकाऱ्याला ही कार्यवाही करण्यास भाग पाडले.तर दुसरा पुढारी मुख्याधिकाऱ्याची मनमानी असून नगरपरिषदेच्या पदाधिकाऱ्यांना न विचारता ही कार्यवाही केल्याचे जनतेला सांगत आहेत. निश्चितच हे पटण्यासारखे नाही. त्यामुळे या दोघांच्या राजकारणाला जनता कंटाळली असून हे '' दोन्ही पुढारी हटवा आणि कटकट मिटवा '' अशाप्रकारे जनतेमध्ये चर्चा आहे.






हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

## पान १ वरुन

### जुलै २०२६ ...

व जिल्हा उपनिबंधक संजय बोराडे यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, कोणी घाबरून न जाता शांतता राखावी. बँक शाखांमध्ये केवळ विमा दावा फॉर्म सादर करण्यासाठीच भेट द्यावी. ठेवीदारांनी अफवांवर विश्वास न ठेवता बँकेस सहकार्य करावे, असे आवाहन केले.

**डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन () म्हणजे काय ?**

ठेवीदारांच्या सुरक्षेसाठी कार्यरत डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन () ही रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची उपकंपनी आहे. १५ जुलै १९७८ रोजी स्थापन झालेल्या या संस्थेमार्फत बँक बंद पडल्यास किंवा तिचा परवाना रद्द झाल्यास प्रत्येक खातेदाराला बचत, चालू, मुदत व आवर्ती ठेवींवर कमाल ५ लाख रुपयांपर्यंत विमा संरक्षण दिले जाते. हा विमा सर्व व्यावसायिक, प्रादेशिक ग्रामीण तसेच सहकारी बँकांना लागू असून, यासाठीचा प्रिमियम खातेदारांकडून न आकारता संबंधित बँकांकडून भरला जातो. बँक अडचणीत आल्यास मार्फत साधारण ९० दिवसांच्या आत दावा प्रक्रिया पूर्ण करून पात्र ठेवीदारांना रक्कम दिली जाते, ज्यामुळे ठेवीदारांचे आर्थिक नुकसान टाळण्यास मदत होते अशी माहिती जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक मंगश केदार यांनी दिली.

### जालन्यातील त्या ...

शहरास नवीन पाणी पुरवठा योजना टप्पा - राबविण्याची मागणी माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी केली आहे. जालना शहरामध्ये मध्ये वापरात येणाऱ्या पाण्यातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरीता अमृत १ अभियाना अंतर्गत भुयारी गटार योजना टप्पा क्र. १ मध्ये ५० द.ल.लि. क्षमतेचे मलशुद्धीकरण केंद्र उभारण्याचं काम सुरू असून, त्यामध्ये नाला वळवणे, मलशुद्धीकरण केंद्र बांधणे इतक्याच उपांगांचा समावेश आहे. त्यामुळे सध्या शहरातील सांडपाणी हे उघड्या गटारातून वाहत असून, मुख्य नाल्यांना मिळालेलं असल्याने शहरात रोगराई व नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उद्भवत आहे. तसेच सध्याची लोकसंख्या ग्राह्य धरून पूढील काही वर्षांत असणाऱ्या पाणी मागणीनुसार ७५ पाणी व त्यातून उत्पन्न होणारे सरासरी ६५ सांडपाणी शुद्धीकरणासाठी टप्पा क्र. १ मध्ये उभारलेल्या ५० मलशुद्धीकरण केंद्राव्यतिरिक्त १५ मलशुद्धीकरण केंद्र उभारणे गरजेचे असल्याचे या निवेदनात गोरंट्याल यांनी नमूद केले आहे. तसेच संपूर्ण शहरात कलेक्शन सिस्टम पाईप अंथरूण बंदिस्त पाईपद्वारे सांडपाणी मलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पोहचविणे गरजेचं आहे. त्यामुळे जालना शहराकरिता टप्पा क्र. २ अंतर्गत अतिरिक्त १५ मलशुद्धीकरण केंद्र उभारणे व संपूर्ण शहरात कलेक्शन सिस्टम योजना राबवणे गरजेचे आहे.

तसेच जालना शहरात मोठ्या प्रमाणात स्टील उत्पादन प्रकल्प असल्या कारणाने सदर कारखानदारांना स्टील आयात व इतर उपयोगासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते त्यामुळे त्यांनी पाण्याची मागणी महानगरपालिकेकडे केलेली आहे. त्याकरीता सांडपाणी प्रकल्पातून उत्पन्न होणाऱ्या पाण्यावर करून सदर पाणी पुनर्वापरात आणण्यासाठी प्रकल्प उभारणी करणे सुद्धा आवश्यक आहे. जालना शहरास स्वच्छ व निरोगी बनविण्यासाठी आपल्या सहकार्याने सूधारीत पाणी पुरवठा योजना, भुयारी गटर योजना व सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर योजना ( ) या सर्व योजनांचा जागतिक बँक अर्थ सहाय्य योजनेत समावेश करून या तिन्ही योजनांना प्रशासकीय मंजूरी द्यावी अशी आग्रही मागणी माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंट्याल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

**जालना शहरासाठी पाणी पुरवठा टप्पा - २ योजना राबवा**

जालना शहरासाठी सध्या कार्यान्वित असलेली जायकवाडी - जालना ही योजना ४ लाख २५ हजार इतकी लोकसंख्या गृहीत धरून मंजूर करण्यात आलेली आहे.मात्र, भविष्यातील वाढती लोकसंख्या आणि पाण्याची मागणी लक्षात घेऊन आणि जालना शहरातील जनतेला पुन्हा पाणी टंचाईला सामोरे जाण्याची वेळ येऊ नये यासाठी जालना शहरासाठी नवीन पाणी पुरवठा योजना टप्पा - २ राबवावी अशी मागणी माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंट्याल यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

ॲग्रोव्हिजनने राबवला पुण्यस्मरण स्तुत्य उपक्रम

# नळविहिरा येथील मोफत नेत्र शिबिराला मोठा प्रतिसाद




**दत्ता देशमुख**

**नळविहिरा -** ता जाफराबाद येथे सोमवार दि. ०४ मे २०२६ रोजी सत्कर्मी स्व. दमोतराव दौलतराव पाटील मोरे ( मा. पोलीस पाटील ) यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेले मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शास्त्रक्रिया शिबिर उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडले.

लॉयन्स नेत्र रुग्णालय छत्रपती संभाजीनगर यांच्या माध्यमातून ॲग्रोव्हिजन गटशेती संघ आणि नल ॲग्रोव्हिजन फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. यांनी हे नेत्र तपासणी शिबीर घडवून आणले. जगप्रसिद्ध व पुरातन ''जय तिर्थेश्वर गणेश मंदिर, श्री नळदमयंती संस्थान'' या ठिकाणी पार पडलेल्या या शिबिरात परिसरातील अनेक गरजवंत रुग्णांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आधुनिक संगणकीय यंत्रणेद्वारे शंभरावर अधिक रुग्णांच्या डोळ्यांची यावेळी तपासणी करण्यात आली. ज्यांना चष्म्याची आवश्यकता होती त्यांना नाममात्र दरात जागेवरच चष्मे उपलब्ध करून देण्यात आले. तसेच मोतीबिंदू आढळलेल्या पंधरा रुग्णांची मोफत शस्त्रक्रियेसाठी नोंदणी करण्यात आली. मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवडलेल्या रुग्णांची लॉयन्स नेत्र रुग्णालय छत्रपती संभाजीनगर येथे मोफत ने-आण, राहण्याची व जेवणाची संपूर्ण व्यवस्था करण्यात येणार आहे. लायन्स नेत्र विभागाचे श्री. योगेश निकाळजे, श्री. पवन रणपिसे, श्री. संतोष मंजुळे या तज्ञ मंडळींनी रुग्णांना योग्य सल्ला व मार्गदर्शनही दिले.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील अनेक रुग्णांना दर्जेदार नेत्रसेवा विनामूल्य मिळाली असून, स्व. दमोतराव पाटील मोरे यांच्या समाजसेवेच्या विचारांना योग्य आदरांजली अर्पण करण्यात आली. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी ॲग्रोव्हिजन गटशेती संघांचे संस्थापक प्रमुख श्री. संजय मोरे पाटील व परिवारासह सहकार्य करणाऱ्या सर्वांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

दीपरत्न रेमेडी



वृतपत्रे (दैनिक, साप्ताहिक) पेज सेटींग
वेब पोर्टल, युट्युब चॅनल
वृत्तपत्रांचे वार्षिक विवरण
नविन शिर्षक (वृत्तपत्र) नोंदणी ऑनलाईन अर्ज
वृत्तपत्रांशी निगडीत सर्व प्रश्नांचे अल्पदरात उपाय

वृत्तपत्र, वेब पोर्टल नोंदणी संदर्भात संपूर्ण मार्गदर्शन
अधिस्विकृती पत्रिकेसंदर्भात संपूर्ण मार्गदर्शन
वृत्तपत्र शासनमान्य यादीत समाविष्ट करण्यासाठी मार्गदर्शन

9975387225 8390098886

# रखडलेली विकासकामे अन् मूलभूत सुविधांची ढासाळलेली स्थिती; शिवसेना आक्रमक

## उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांची घेतली भेट

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील रखडलेल्या विकासकामांचा वाढता ढिगारा, मूलभूत सुविधांची ढासळलेली स्थिती आणि नागरिकांच्या तीव्र नाराजीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना आक्रमक झाली आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या शिष्टमंडळाने थेट राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री यांची भेट घेत जालना शहरातील विविध गंभीर प्रश्न मांडले.

शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी बैठकीत स्पष्ट शब्दांत सांगितले की, जालना शहराचा विकास अक्षरशः ठप्प झाला आहे. अनेक महत्त्वाची विकासकामे महिनोन्महिने प्रलंबित असून प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही होत नाही. यामुळे नागरिकांना रोजच्या जीवनात मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे. रस्त्यांवरील खड्डे, वारंवार होणारे पाणीपुरवठ्याचे खंड, अस्वच्छतेमुळे निर्माण होणारे आरोग्याचे प्रश्न आणि सार्वजनिक ठिकाणांची दयनीय अवस्था यामुळे नागरिकांचा संयम सुटत चालल्याचे शिष्टमंडळाने नमूद केले.

छत्रपती संभाजी उद्यानाची दयनीय अवस्था

शहरातील प्रमुख सार्वजनिक ठिकाण असलेल्या परिसराची अवस्था अत्यंत बिकट झाली असल्याचे विशेषत्वाने मांडण्यात आले. उद्यानातील देखभाल अभावी तुटलेली साधने, अस्वच्छ परिसर आणि सुरक्षा व्यवस्थेचा अभाव यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. तातडीने निधी उपलब्ध करून उद्यानाचे नूतनीकरण करण्याची मागणी करण्यात आली.

मोकाट कुत्र्यांचा वाढता धोका

शहरात मोकाट कुत्र्यांची संख्या झपाट्याने वाढत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. विशेषतः लहान मुलांवर हल्ल्याच्या घटना वाढत असल्यामुळे पालकांमध्ये चिंता वाढली आहे. या समस्येवर तातडीने नियंत्रण आणण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.

प्रशासनावर सवाल, राजकीय वातावरण तापले

या सर्व मुद्द्यांवरून शहरातील प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. नागरिकांच्या समस्या वेळेवर न सोडवल्याने प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शिवसेनेच्या या आक्रमक भूमिकेमुळे जालना शहराच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

बैठकीत मान्यवरांची उपस्थिती

या बैठकीला आमदार , विरोधी पक्षनेते कमलेश खरे, गटनेते दीपक राठोड, नगरसेवक दुर्गेश काठोटीवाले, अमोल



ठाकूर, दर्शना खोतकर, निखिल पगारे, श्रीकांत पांगळकर, संजय डुकरे तसेच सामाजिक कार्यकर्ते दिनेश भगत आदी उपस्थित होते.

निधी मिळणार का? नागरिकांची उत्सुकता

शिवसेना नगरसेवकांनी थेट उपमुख्यमंत्र्यांकडे धाव घेतल्यामुळे आता जालना शहरासाठी विशेष निधी मिळणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शहरातील प्रलंबित विकासकामांना गती मिळेल का आणि नागरिकांच्या दैनंदिन समस्यांवर दिलासा मिळेल का, हे येणारा काळच ठरवणार आहे.

# परमेश्वराशी एकरूप होऊन पूर्णत्वास प्राप्त होणे म्हणजे काला - डॉ प्रमोद कुमावत

**दत्ता देशमुख**

**टेंभूर्णी -** नदी समुद्राला जाऊन मिळाली तेथे ती पूर्ण झाली, मंदिराचा कळस स्थापन झाला, काम पूर्ण झाले, हरिनाम सप्ताहात काल्याचे कीर्तन झाले, सप्ताह पूर्ण झाला. तसे जीवनात परमात्म्याची प्राप्ती झाली, आता जीवन पूर्ण झाले. यालाच काला म्हणतात. काला तीन प्रकारचा असतो पहिला दह्यालाह्याचा काला, दुसरा नामरूपाचा काला, तिसरा जीवब्रम्हात्मैक्याचा काला

हाच काला वारकरी संप्रदायात अभिप्रेत आहे असे प्रतिपादन काल्याचे कीर्तन प्रसंगी वेदांताचार्य हभप डॉ प्रमोद महाराज कुमावत यांनी केले.

गोलापांगरी येथे २७ एप्रिल ते ४ मे पर्यंत हनुमान मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहात हभप निवृत्ती महाराज देव्हडे,हभप प्रेममूर्ती श्रीहरी महाराज रसाळ,हभप विठ्ठल महाराज चव्हाण,विनोदाचार्य हभप वैजिनाथ महाराज पोपळघट, हभप सोपान महाराज फुके,हभप सतिश महाराज बनकर, हभप सोपान महाराज जाधव यांची कीर्तने संपन्न झाली.



पुढे बोलताना डॉ प्रमोद कुमावत म्हणाले की, भगवान श्रीकृष्णांनी सामाजिक समरसता, सामाजिक ऐक्याचा संदेश दिला. सर्वांना एकत्रित घेऊन काम करता येते हे चरित्रातून दाखवून दिले. वारकरी संप्रदायामध्ये भेदाला स्थान नाही. विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म, भेदाभेद भ्रम अमंगळ असे तुकाराम महाराज म्हणतात. गोकुळीच्या सुखा, अंतपार नाही लेखा ।। बाळकृष्ण नंदाघरी, आनंदल्या नरनारी।। गुढिया तोरणे, करती कथा गाती गाणे।। तुका म्हणे छंदे, तेने मोहिले गोविंदे।। या काल्याच्या अभंगावर डॉ कुमावत यांनी निरूपण केले. गोकुळातील सुखाला परावार राहिला नव्हता कारण तेथे बाळकृष्णाचे प्राकट्य झाले होते. जिथे भगवंत असतो तिथे दुःख नसते व जिथे भगवंत नसतो तिथेच दुःख असते. लोकांना सुख हवे आहे परंतु सुखाचे साधन आवडत नाही, दुःख कुणालाच नकोय परंतु दुःखाचे कारण सुटत नाही. दुःखाचे कारण संसार आहे, संसार सुटत नाही व सुखाचे साधन भगवंत आहे, भगवंत आवडत नाही. त्यामुळे जीवनामध्ये सुखरूपता प्राप्त होत नाही. आपले जीवन शुद्ध असले पाहिजे. एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ, हा संतांचा संदेश आहे. सर्वे सुखीनः संतु सर्वे संतु निरामयाः हा वेदाने दिलेला संदेश आहे. संपूर्ण विश्व एक कुटुंब आहे या कुटुंबातील सर्वांचे कल्याण व्हावे असा संतांचा आग्रह आहे. एवढे मोठे अंत:करण व्हावे लागते तेव्हा भगवंत भेटत असतो. या सप्ताहात हभप सुरेश महाराज बोंद्रे यांचे रामायण कथा झाली तसेच रोज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व सकाळी काकडा संध्याकाळी हरिपाठ झाला. गायनाचार्य हभप मधुकर मुळे, ज्ञानेश्वर कावळे, तुकाराम कावळे, विठ्ठल नाना मोरे, अशोक सोनवणे, नरेंद्र जैस्वाल, मृदंगाचार्य हभप अजय महाराज काळे, हभप वैष्णव महाराज कावळे हे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वश्री सुभाष मोरे, अण्णाभाऊ मोरे,विजय सोनवणे, बालाजी खेडकर, ज्ञानेश्वर मोरे, काकासाहेब पोपळघट यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला परिसरातील भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# रस्त्याच्या दुतर्फा नसलेले पांढरे पट्टेआणि वळणावरील गतिरोधकच अपघाताला कारणीभूत

## चुकीच्या गतिरोधक टाकल्याची प्रवासी, वाहन चालकांमध्ये चर्चा

**दत्ता देशमुख**

**टेंभूर्णी -** जाफराबाद मावरा मार्गे भोकरदन कडे जाणारे, जाफराबाद टेंभुर्णी मार्गे जळगाव राजाकडे जाणारी रस्त्यावर गतिरोधक टाकण्याचे काम चालू असतानाच टाकलेल्या गतिरोधकांच्या संदर्भात दिशादर्शक पांढरे पट्टे व सूचनाफलक नसल्यामुळे व चुकीच्या ठिकाणी गतिरोधक टाकल्यामुळे अपघाताला आमंत्रण असल्याचे प्रवासी आणि वाहनचालकामध्ये तीव्र स्वरूपाची नाराजी असून ते तात्काळ बदलण्याची मागणी होत आहे.

देऊळगाव राजा (बुलढाणा जिल्हा) आणि कन्नड (छत्रपती संभाजीनगर जिल्हा) यांना जोडणारा मार्ग क्रमांक १७८ प्रामुख्याने जाफ्राबाद मार्गे जातो.

रस्त्यावरील खुणा हे रहदारीचे नियमन,सुरक्षितता आणि वाहनचालकांना दिशा देण्यासाठी रस्त्याच्या पृष्ठभागावर रंगवलेले पट्टे, बाण किंवा शब्द असतात, हे प्रामुख्याने पांढऱ्या किंवा पिवळ्या रंगात असतात,जे लेनिंग,थांबणे,ओव्हरटेकिंग आणि पादचारी क्रॉसिंग सूचित करतात,महत्त्वाच्या रस्त्यावरील खुणा आणि त्यांचे अर्थ:तुटक पांढरी रेषा,लेन बदलण्याची किंवा सावधगिरीने ओव्हरटेक करण्याची परवानगी आहे,सलग पांढरी रेषा,लेन बदलण्यास मनाई आहे;आपल्या लेनमध्येच राहावे,दुहेरी सलग रेषा,ओव्हरटेकिंग सक्त मनाई आहे, विशेषतः वळणावर किंवा धोकादायक ठिकाणी पिवळी रेषा,विरुद्ध दिशेची वाहतूक वेगळी करण्यासाठी वापरली जाते,झेब्रा क्रॉसिंग,पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्यासाठी बनवलेले पांढरे पट्टे,थांबा रेषा,सिग्नल किंवा जंक्शनवर वाहने कुठे थांबवावीत हे दर्शवणारी सलग रेषा. दिशा बाण,वाहनाने कोणत्या दिशेने जावे (थेट,वळण) हे दर्शवतात.या खुणा सुरक्षित प्रवासासाठी आणि अपघाता टाळण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत.





भारतात स्पीड ब्रेकर (गतिरोधक) बनवण्याचे नियम इंडियन रोड्स काँग्रेस () द्वारे ठरवले जातात.उंची १०-१२ सेमी, रुंदी ३.५ ते ३.७ मीटर,आणि वर्तुळाकार त्रिज्या १७ मीटर असावी, गतिरोधकावर काळ्या-पांढऱ्या पट्ट्या आणि ४० मीटर आधी सूचना फलक लावणे अनिवार्य आहे. हे नियम पाळणे सुरक्षिततेसाठी गरजेचे आहे.स्पीड ब्रेकरचे मुख्य नियम () स्पीड ब्रेकरचा आकार गोलाकार असावा,खूप टोकदार नसावा. उंचीः १० ते १२ सेंटीमीटर.रुंदीः ३.५ ते ३.७ मीटर,रंग आणि दृश्यमानता :स्पीड ब्रेकरवर पांढऱ्या आणि काळ्या रंगाचे पट्टे असावेत,जेणेकरून रात्रीच्या वेळी ते स्पष्ट दिसतील.थर्मोप्लास्टिक पेंटः पेंट पुसट झाल्यास पुन्हा रंगवणे गरजेचे आहे,सूचना फलक स्पीड ब्रेकरच्या ४० मीटर आधी सावधगिरीचा फलक असावा,वाहन चालकांना वेग कमी करण्याची सूचना देणारा फलक असावा.

गतिरोधक हे ट्रॅफिक मॅनेजमेंट डिव्हाइसेस आहेत,जे वाहनांचा वेग कमी करण्यासाठी रस्त्यावर उभारले जातात त्यामागील उद्देश वाहनांचा वेग कमी करणे आणि रस्ता अपघातांवर आळा घालणे,आणि दुसरा नियम यावर पांढरे पट्टे असावे लागतात,जेणेकरून ते लांबून दिसू शकतील,आणि रस्ता बाजूला कुठपर्यंत आहे ते समजू शकेल.

*मात्र संबंधितांनी हे सर्व नियम धाब्यावर बसवून ठेवल्या मुळे बर्याच निष्पाप लोकांचा आपला जीव गमवावा लागला आहे,आणि बरेच वाटसरू ना अपंगत्व आले आहे. तेव्हा सार्वजनिक बांधकाम आणि रस्ते वाहतूक परिवहन विभागाचे दुर्लक्षित पणामुळे होणाऱ्या परिणामांची जबाबदारी निश्चित करून संबंधितांवर प्रवाशांचे अपंगत्व आणि जीवितहानी प्रकरणी गुन्हे दाखल करावेत अशी मागणी केली जात आहे.